महाराष्ट्र शासन
ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
नगर भवन, मुंबई —४०० ०२३

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानांतर्गत ४४ व्या ग्रंथभेट योजनेसाठी सन-२०१७ या कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करणे.

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानांतर्गत सन २०१७ मध्ये प्रकाशित झालेले मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ प्राप्त करुन त्यातील उपयुक्त ग्रंथांची निवड करुन त्याप्रमाणे खरेदी केलेले ग्रंथ राज्यामधील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथभेट योजनेतून द्यावयाचे आहेत. सदर ग्रंथांची निवड करण्यासाठी, सन २०१७ या कॅलेंडर वर्षात (**१ जानेवारी, २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७**) प्रकाशित झालेल्या ग्रंथांची (प्रथम आवृत्ती) प्रत्येकी एकेक विनामुल्य प्रत (Complimentary copy) **ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दि. २८/०२/२०१८ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सदर दिनांकानंतर ग्रंथ प्राप्त झाल्यास त्याचा ग्रंथ निवडीसाठी विचार केला जाणार नाही.**

**तसेच, त्याच ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई येथे ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने आणि मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे, नागपूर व राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई येथेही पाठविणे आवश्यक आहे.** त्याप्रमाणे ग्रंथ पोहोचल्याची पोच संबंधीत ग्रंथालयांकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची ग्रंथ पोच ग्रंथांसोबत टपालामार्फत वा समक्ष पाठवावी, असे केल्याची खात्री झाल्यानंतरच २०१७ मधील ती ग्रंथ अंतिमत: खरेदीसाठी ग्रंथालय संचालनालयामार्फत विचारात घेण्यात येतील. अधिक माहितीस्तव www.rrrf.nic.in हे संकेतस्थळ अवलोकावे.

**सदरचे निवेदन महाराष्ट्र शासनाच्या** www.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर ठेवण्यात आले आहे.**

(किरण ग. धांडोरे)
**ग्रंथालय संचालक**